सदरक्षणाय खलनिग्रहणाय

महाराष्ट्र शासन
**पोलीस विभाग**
वार्ताहर कक्ष,
पोलीस आयुक्त, यांचे कार्यालय,
डॉ. डी. एन. रोड, मुंबई-४००००१.

दूरध्वनी क्र. २२६२०३३२
Email I.D. – pressroom.mum@mahapolice.gov.in

---

जा.क्र. ८१० /वार्ता.कक्ष/२०२१ दिनांक :- १७/११/२०२१

## —: प्रेस नोट :—

## —:निर्भया पथक कामगिरी:—

घाटकोपर पोलीस ठाणे, मुंबई येथे दि. १७/११/२०२१ रोजी ठाणे अंमलदार यांना फिर्यादी व त्यांची अल्पपयीन मुलगी रा.ठी. सेवा संघ सोसायटी, बाबा जवळ, राजेश किराणा जनरल स्टोअर, सुंदर बाग संजय नगर, घाटकोपर पश्चिम, मुंबई यांनी येऊन कळविले की, फिर्यादी त्यांचे कामानिमित्त बाहेर जाणार होते त्याकरिता त्यांचे दोन मुली यांच्यावर लक्ष ठेवण्याकरता फिर्यादी यांचे नातेवाईक याला घरी बोलावले होते.

यातील अटक आरोपी (नातेवाईक) याने सदर बळीत मुलगी अल्पवयीन असल्याचे माहित असताना देखील तिच्यावर लैंगिक अत्याचार केला व बळीत मुलीस कुणाला घडलेला प्रकार सांगू नकोस असे सांगितले. बळीत मुलीने तिची आई घरी आल्यानंतर घडलेला प्रकार सांगितला. फिर्यादी बळीत मुलीसह घाटकोपर पोलीस ठाणे येथे आल्या असता ठाणे अंमलदार म.पो.ऊ.नि. रुपाली पाटील व साध्या वेषातील निर्भया पथकावरील अधिकारी म.पो.ऊ.नि. शितल जाधव यांनी बळीत मुलीस विश्वासात घेवून विचारणा केली असता तिने तिच्यावर नमुद अटक आरोपी याने लैंगिक शोषण केल्याचे सांगितले. नमूद बळीत मुलीची आई तक्रार करण्यास तयार नव्हती निर्भया पथकावरील अधिकारी यांनी त्यांना बालकांचे लैंगिक अत्याचारापासून संरक्षण व अधिनियम याबाबत माहिती देवून समजावून सांगितले असता नमूद महीला फिर्याद देण्यास तयार झाली. फिर्यादीने सांगितलेल्या घटनेस अनुसरून गु.र.क्र. ८४३/२०२१ कलम ३७६,३७६(२)(फ) (आय )(जे), ३७७ भा.दं. वि. सह पोक्सो कायदा कलम ४, ६, ८, १०, १२ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला.

(चैतन्या एस.)
पोलीस उप आयुक्त (अभियान),
जनसंपर्क अधिकारी,
पोलीस आयुक्त कार्यालय, मंबई

Scanned with CamScanner